





*राम तेरी...*च्या या गाण्यात प्रत्येक शॉटनंतर मंदाकिनीच्या पायांना ब्रान्डी चोळावी लागत असे

आऊटडोअर कोरियोग्राफीः

नाचता येईना...

आऊटडोअरवर नृत्यगीताचं चित्रीकरण यासारखा नकोसा वाटणारा अनुभव दुसरा नसेल. नाचता येईना कारण अंगण खरंच वाकडं अशी परिस्थिती असते.

□ नरेंद्र उपाध्याय

मिर्झा साहिब या चित्रपटाच्या एका गीताचं चित्रीकरण करायचं होतं. निर्माता-दिग्दर्शन योग्य चित्रीकरण स्थळाच्या शोधात होते. अखेरीस त्यांना एक लोकेशन पसंत पडलं. मात्र त्या लोकेशनविषयी ऐकताच संगीतकार नौशाद अस्वस्थ झाले. असं का?

कारण त्यावेळी संगीतकारांना प्रत्यक्ष लोकेशनवर जाऊन गाण्याला संगीत द्यावं लागत असे. नौशादजींची अस्वस्थता अनाठायी नव्हती. *मिर्झा साहिबा*च्या त्या गाण्यासाठी नायकासह पाच-सहा घोड्यांची आवश्यकता होती आणि म्हणूनच निर्माता-दिग्दर्शकाने प्रत्यक्ष तबेल्यात चित्रीकरण करायचं ठरवलं. झालं, ठरल्याप्रमाणे आपल्या वाद्यांचा जामानिमा घेऊन, वादक मंडळींसह नौशादसाहेब चित्रीकरणस्थळी पोहोचले तिथलं वातावरण पाहून त्यांची अस्वस्थता आणखी वाढली. तबेल्यात सर्वत्र दुर्गंधी पसरलेली होती. वाद्यवृंदासह बैठक मांडायला पुरेशी आणि स्वच्छ जागा नव्हती. तशातही नौशाद आपल्या साथीदारांसह वाद्यांची जुळवाजुळव करून संगीत द्यायला सरसावले. कलाकार आणि नृत्य दिग्दर्शक शॉटसाठी तयार होते. कॅमेऱ्यांसह कॅमेरामननी आपापल्या जागा पटकावल्या. इतकंच नाही तर, तबेल्यातले सहा उमदे घोडेही शॉटसाठी तयार होते. सीनचा पहिला तुकडा शूट करण्यात आला. नौशादजींनी धून छेडली आणि तबलजींनी सवयीने तबल्यावर थाप दिली. तो आवाज त्या तबेल्यात घुमला. आणि त्या आवाजाने घोडे बिथरले. घाबरून सैरावैरा पळू लागले. वाद्यवृंदाने आपापली वाद्यं सोडून जमेल त्या दिशेने पळ काढला. कॅमेरामन कॅमेरे सोडून केव्हाच पळाले. जो तो सुरक्षित जागा बघून आपला जीव वाचवायचा प्रयत्न करत होता. सैरभैर झालेल्या घोड्यांच्या खुरांखाली युनिटचं बरचसं सामान तुडवलं गेलं. त्यांना अटोक्यात आणता आणता प्रशिक्षकांच्याच तोंडाला फेस आला. अखेरीस त्यांनीं कसं बसं घोड्यांना वठणीवर आणलं. त्या दिवशी चित्रीकरण झालं नाही, हे वेगळं सांगायला नको.

चित्रपटांतली गीतं ही बरेचदा बाह्य चित्रीकरण स्थळांवर चित्रीत केली जातात. पण चित्रीकरणातलं त्यासारखं जिकीरीचं काम क्वचितच दुसरं एखादं असेल. कितीही चोख व्यवस्था असली आणि अत्याधुनिक सोयी-सुविधा, सामुग्री असली तरी बाह्यस्थळांवर चित्रीकरण करताना अनंत अडचणींना सामोरं जावं लागतं. त्यात जोखीमही बरीच असते.

*राम तेरी गंगा मैली*च्या शीर्षकगीताचं चित्रीकरण करण्यासाठी राजू कपूरजी आपल्या ताफ्यासह गंगोत्रीच्या लोकेशनवर पोहोचले, त्यावेळी तिथे जीवघेणी थंडी होती. तशातच मंदाकिनीला गुडघ्यापर्यंत साडी नेसवण्यात आली. संथाल शैलीतल्या त्या अर्ध्या साडीच्या गेटअपसह मंदाकिनीला बर्फाच्छादित खडकांवर नृत्य करायचं होतं. थंडीमुळे तिचं




*दिल का क्या कसूर*मधील या गीतात दिव्याचे पाय गवताच्या पात्यांनी सोलवटले होते.



*जहरीला इन्सान*च्या या रोमँटिक गाण्यात मौसमीला नाही पण ऋषी कपूरला गंभीर इजा झाली.

तापलेल्या खडकांवर नृत्य करताना माधुरीच्या तळपायांना फोड आले होते.



शरीर थरथरत होतं. प्रत्येक शॉटनंतर ती गरम कोट अंगभर लपेटून शेकोटीच्या दिशेने धाव घ्यायची. शॉट संपताच एक स्पॉट बॉय तिच्या तळव्यांना ब्राण्डी चोळत असे. अशारितीने मंदाकिनीने *राम तेरी गंगा मैली*चं शीर्षकगीत पूर्ण केलं होतं.

*कुर्बानी*च्या एका नृत्यगीताचा अनुभव असाच गंमतीशीर आहे. महाबळेश्वरला एका सरोवरात नौकेतलं दृश्य होतं. फिरोज खान-झीनत अमानचं ते एक रोमॅण्टिक गीत होतं. गाण्याचे बोल होते, 'हम तुम्हे चाहते है ऐसे...'

झीनत अमान आणि फिरोज खान या दोघांबरोबर युनिटचे चाळीस सदस्यही नौकेवर होते. नौका चालवणाऱ्यांनी थोड्या लोकांनी खाली उतरावं म्हणून सूचनाही दिली. पण त्याच्या सांगण्याकडे कोणी लक्ष दिलं नाही. आणि चित्रीकरण करत करत ती नौका सरोवराच्या मध्यावर पोहोचली आणि अचानक डोलू लागली. नावाड्याचं नियंत्रण सुटलं आणि ती एका बाजूला कलंडली. त्यासरशी शूटिंगचे कॅमेरे आणि रिफ्लेक्टर्स पाण्यात पडले. अनेकांनी घाबरून पाण्यात उड्या मारल्या आणि जीव वाचवण्यासाठी हात-पाय मारायला सुरुवातही केली होती. भरीत भर त्यावेळी जोरदार वारा वहात होता. त्यामुळे नौकेवर नियंत्रण ठेवून ती पूर्ववत करणं नाविकासाठीही मोठं आव्हान होतं. तरी त्याने कशीबशी नाव सरळ केली, पाण्यात पडलेल्या लोकांना नौकेवर घेतलं आणि ती जेमतेम किनाऱ्याला लावली. त्यावेळी दुर्दैवाने नौका पूर्ण उलटली असती तर त्या चाळीस जणांची 'कुर्बानी' दिली गेली असती.

*बॉम्बे टू गोवा*मधल्या 'जग छोडा है तेरे प्यार कीं कसम...'चं चित्रीकरण बँगलोरला होतं. त्यावेळी अमिताभ अगदीच नवखा होता. त्याला नृत्याच्या स्टेप्स नीटशा जमत नसल्याचं डान्स मास्टर पी.एल.राज यांच्या लक्षात आलं. त्यांनी आणखी एकदा रिहर्सल करायला सांगितलं. पण आता आऊटडोअर लोकेशनवर रिहर्सल रूम कशी उपलब्ध होणार? इकडे तिकडे चौकशी करता स्टीलचा एक जुना बंद पडलेला कारखाना मिळू शकत असल्याचं समजलं. तिथलं सामान एका कोपऱ्यात रचून रिहर्सलसाठी जागा मोकळी करण्यात आली. अमिताभने त्या आडनिड्या जागेत कशीबशी रिहर्सल केली आणि अखेरीस ते गाणं पूर्ण करण्यात आलं.

*लव्ह मॅरेज*च्या एका गीतात अनिल कपूरला मोटारबाईकवर मीनाक्षीबरोबर



*होशियार*च्या सेटवर मीनाक्षीचा लाल ड्रेस पाहून तिच्या मागे गेंडा लागला.

रोमान्स करायचा होता. गीत गाता गाता आणि रोमान्स करता करता हे प्रेमी बाईकसह रस्त्यावर आले. अचानक बाईक घसरली आणि दोघंही सणकून आपटले. सुदैवाने दोघांपैकी कोणालाच इजा झाली नाही.

असंच एकदा *दिल का क्या कसूर*च्या एका गाण्याच्या वेळी झालं. या चित्रपटाचं शीर्षकगीत महाबळेश्वरला चित्रीत करण्याचं ठरलं. उंच डोंगरावर वाढलेलं गवत सुकलं होतं. त्या गवतातून चालताना पायाला ओरखडे उठत होते आणि खाजही येत होती. दिव्या भारतीच्या नाजूक पायांत काटे रुतले. वेदना असह्य होऊन ती रडत होती. त्या वेदना सहन करत आणि डोळ्यातले अश्रू लपवत दिव्याने रोमॅण्टिक गीत पूर्ण तर केलं. पण नंतर तिच्या पायातून रक्त वाहू लागलं. पॅकअपनंतरही दिव्याच्या डोळ्यातले अश्रू थांबले नव्हते.

माधुरीला तर कारकीर्दीच्या सुरुवातीच्या दिवसांतच आऊटडोअरच्या या नकोशा वाटणाऱ्या अनुभवाला सामोरं जावं लागलं होतं. *उत्तर दक्षिण* चित्रपटासाठी ती बॅंगलोरच्या डोंगराळ भागात शॉट देत होती. रणरणत्या उन्हाने तापलेल्या खडकांवर सरोज खानने माधुरीला नाचवलं होतं. अर्थात प्रत्येक शॉटच्या आधी ती खडकांवर थंड पाणी टाकून ते थंड करायचा प्रयत्न करत होती. तरीही संध्याकाळी पॅकअपनंतर माधुरीचे तळवे सोलवटल्याचं तिच्या लक्षात आलं. तळव्यांना फोडही आले होते. हॉटेलवर पोहोचली तेव्हा माधुरी तापाने फणफणत होती. पण कौतुकाची गोष्ट अशी की, त्या परिस्थितीत आणि तशा अवस्थेतही तिने दुसऱ्या दिवशी सेटवर हजर राहून नृत्याचं उर्वरित चित्रीकरण पूर्ण केलं.

*मुकद्दर*साठी दिग्दर्शक रवी टंडन यांनी रावणाचा एक प्रचंड पुतळा बनवून घेतला होता. रेखा आणि परिक्षित सहानी या दोन कलाकारांसह एक समूहगीत चित्रीत करण्याचा त्यांचा विचार होता. 'मेहनत की जलती मशालें जला...' या समूहगीतात रेखाबरोबर अनेक लोकांच्या हाती पेटत्या मशाली देण्यात आल्या होत्या. एका लॉंग शॉटदरम्यान रेखाच्या हातातली पेटती मशाल कलंडून त्यातलं गरम तेल हातावर आलं. तिची त्वचा जळली. पण त्या वेदनेची पर्वा न करता तिने तो शॉट पूर्ण केला. शॉट ओके झाल्याची सूचना मिळताच रेखाने किंचाळत हातातली पेटती मशाल फेकून दिली, तेव्हा कुठे तिच्या भाजलेल्या हाताकडे लोकांचं लक्ष गेलं.

*मालकिन*च्या शूटिंगच्यावेळी सारीका एका बागेतल्या कारंज्याखाली भिजत नाचत होती. त्यावेळी तिचा पाय निसरड्यावरून घसरला आणि ती चांगलीच आपटली. दोन आठवडे तिला सक्तीचा आराम करावा लागला होता. *जानम समझा करो*च्या एका गाण्याचं लंडनच्या बाजारातल्या भरवस्तीत शूटिंग सुरू होतं. त्यावेळी गर्दीचा फायदा घेऊन काही गुंडांनी प्रॉपर्टीची ट्रंकच चोरली. सलमान-ऊर्मिलाला रेडीमेड कपडे घालून तो डान्स सिक्वेन्स पूर्ण करावा लागला. *जहरिला इन्सान*मध्ये ऋषी कपूरला मैसूरच्या रस्त्यावर मौसमी चटर्जीसह एक गीत चित्रीत करायचं होतं. तेही सायकलवर. दोन शॉट ठरल्याप्रमाणे पार पडले. तिसऱ्या शॉटच्या वेळी ऋषी कपूर-मौसमीसह सायकलवरून पडला आणि थेट हॉस्पीटलमध्येच दाखल झाला.

आऊटडोअरला गाण्याचं चित्रीकरण करताना आणखी एक अडचण असते ती गर्दीची. *लीडर*चं आग्राला ताजमहालमध्ये शूटिंग चालू होतं. 'एक शहनशाह ने बनवाके हसी ताजमहल...' हे गाणं होतं. दिलीपकुमार-वैजयंतीमालावर ते गाणं चित्रीत केलं जात होतं. चित्रीकरण बघायला लोटलेल्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस व्यवस्थाही चोख ठेवण्यात आली होती. पण गर्दी आणि पोलीस यांच्यातच बाचाबाची होऊन गंभीर परिस्थिती निर्माण झाली. हे पाहून घाबरलेल्या कलाकारांनी गाडीकडे धाव घेऊन हॉटेल गाठलं. कसंबसं सामान गोळा करून सुरक्षित ठिकाणी हलवलं. या धावपळीत बागेतल्या झाडांची नासधूस झाली. तेव्हापासून ताजमहालामध्ये चित्रीकरणावर बंदी घालण्यात आली. *लीडर*नंतर अनेक वर्षं ताजमहालमध्ये कोणत्याही चित्रपटाचं चित्रीकरण झालं नाही.

आफ्रिकेच्या युगान्डामध्ये *होशियार*चं शूटिंग सुरू होतं. मीनाक्षी शेषाद्री आणि जितेंद्रवर एक रोमॅण्टिक गाणं चित्रीत करण्यात येत होतं. त्यावेळी आफ्रिकेच्या जंगलात आढळणाऱ्या प्राण्यांचीही काही दृश्यं टिपली जात होती. एका शॉटमध्ये मीनाक्षी नृत्य करता करता पुढे स्टेप्स टाकत होती, तेव्हा ते टिपणाऱ्या कॅमेरामनच्या लक्षात आलं की तिच्यामागे एक गेंडा लागलाय. कोणी तिच्या मदतीसाठी धावण्याआधीच गेंड्याने मीनाक्षीच्या दिशेने यायला सुरुवात केली होती. मीनाक्षी पुढे आणि गेंडा मागे, युनिटची गाडीही तिच्या मागे पळू लागली. कोणीतरी तत्परतेने मीनाक्षीच्या अंगावर काळं कापड टाकलं. ते पाहून गेंडा जागीच थांबला. प्रत्यक्षात मीनाक्षीने परिधान केलेले भडक कपडे पाहून तो गेंडा तिच्या मागे लागला होता.

या सगळ्यापेक्षा रोमांचक घटना घडली ती *अमन*च्या सेटवर. नायगरा धबधब्याच्या लोकेशनवर राजेंद्रकुमार आणि सायरा बानो शॉट देत होते. 'आज की रात ये कैसी रात...' गाण्याचे शॉट्स होते. गंमत अशी की दिग्दर्शकाने 'कट' म्हटल्यावरही बराच वेळ ते दोघं एकमेकांच्या मिठीत बद्ध होते. नायगरा धबधब्यासारख्या लोकेशनवर रोमॅण्टिक शॉट देताना कलाकारांनी त्याच्याशी असं एकरूप होणं स्वाभाविकच आहे नाही? ★